वैद्यकीय विभाग
आवक क्र. 228
दिनांक-20/8/15
लिपीक

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा २०१५/प्र.क्र.१०/आ-५**
जी.टी. रुग्णालय आवार, १० वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १२ मार्च, २०१५

**वाचा -**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी २०१४/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प, दि.२७/०६/२०१४.

२) आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे क्र.राआसोम/एफएमजी/राहि/४३७६६-७१/२०१४-१५, दि.१६/१०/२०१४

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यात डासांमार्फत प्रसारित होणाऱ्या हिवताप, हत्तीरोग, डेंगी ताप, जॅपनिज एन्सेफेलिटिस (मेंदूज्वर), चिकनगुनिया, सॅडफ्लाय मार्फत प्रसारीत होणारा चंडीपूरा, एन्सेफेलिटिस तसेच पिसवांमार्फत प्रसारीत होणारा प्लेग या रोगांच्या नियंत्रणासाठी उपाय योजना राबविण्यात येतात. राज्यात राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम सन १९५३ पासून व राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम १९५७ पासून राबविण्यात येत आहे. सन २००४ पासून उपरोक्त सर्व कार्यक्रमांचे एकत्रिकरण करून राष्ट्रीय किटकजन्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ठये पुढीलप्रमाणे :-

अ) औद्योगिक व शेतकी कार्यावर हिवतापाचा परिणाम होऊ न देणे

ब) हिवताप, डेंगी ताप, मेंदूज्वर मुळे होणारे मृत्यूचे प्रमाण सन २०१२ पर्यंत ५० टक्के कमी करणे व रुग्णसंख्या नियंत्रणात ठेवणे.

क) सन २०१५ पर्यंत बाह्यलक्षणेयुक्त हत्तीरोगाचे निर्मुलन करणे.

सदर कार्यक्रमांतर्गत नवीन हिवताप रुग्ण शोधण्यासाठी राज्यातील सर्व पाड्या, वाड्या, वस्ती, गाव पातळीवर कर्मचाऱ्यांमार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते. यामध्ये स्थानिक आशा स्वयंसेवक/ पाडा स्वयंसेवकांचा समावेश केला जातो. डेंगी, चिकनगुनिया व जे.ई. तापाच्या निदानासाठी राज्यातील विविध भागात २३ सेंटिनेटल सेंटरची निर्मिती केली आहे. हिवतापाची चिन्हे व लक्षणाधारित संशयित रुग्णास क्लोरोफीन गोळयांचा तीन दिवसाचा उपचार आणि हिवताप रुग्णास

Mr Reshma
नोंद घ्यावी
17/8/15

क्लोरोफीन, प्रायमाक्विन व ए.सी.टी. चा नवीन औषधोपचार पध्दतीनुसार समूळ उपचार केला जातो. तसेच डास नियंत्रणासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत व हत्तीरोग नियंत्रण पथकामार्फत ग्रामीण व शहरी भागात घरोघरी जाऊन किटकनाशक फवारणी, अळीनाशक फवारणी, जीवशास्त्रीय उपाययोजनांतर्गत गप्पी माशांचा वापर इत्यादी उपाययोजना करण्यात येतात, त्यामुळे वरील रोगांची रुग्ण संख्या नियंत्रणास मदत होते. हा कार्यक्रम योग्यरितीने राबविला जावा याकरीता राज्य /जिल्हा/तालुका/ प्रा.आ. केंद्र स्तरावरुन क्षेत्रीय भेटीद्वारे मुल्यमापन व संनियंत्रण केले जाते. विविध संवर्गातील आरोग्य कर्मचारी यांना किटकजन्य रोगाबाबत प्रशिक्षण देण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार हिवताप, डेंग्यू कार्यक्रमाविषयी जनतेमध्ये जनजागृती, शालेय डेंग्यू जागृती मोहिम राबविण्यात येते. याशिवाय हत्तीरोग दूरीकरण करण्यासाठी राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील संवेदनशील अशा लोकसंख्येच्या क्षेत्रात सामुहीक औषधोपचार मोहिमे अंतर्गत गोळ्यांचे वाटप करण्यात येते. प्राप्त हत्तीरोग बाह्यलक्षणेयुक्त रुग्णांची अंडवृध्दी शस्त्रक्रीया करण्यात येते.

हा कार्यक्रम राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा भाग असून मागील तीन वर्षात मंजूर पीआयपी नुसार कार्यक्रम राबविण्याकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी अंमलबजावणी अधिकाऱ्यांना थेट प्राप्त होत होता. त्यामुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नव्हती. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने निधी वितराणाबाबत धोरणात्मक बदल केला असून आता केंद्र शासनाचा निधी यापुढे राज्य शासनाच्या कोषागारात जमा होणार असून, सदर निधी अर्थसंकल्पीत केल्यानंतर त्याचे वाटप संबंधीत कार्यक्रम अंमलबजावणी अधिकाऱ्यांना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाकरीता निधी वितरीत करण्यासाठी प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

**केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास, तसेच सन २०१४-१५ करिता सदर कार्यक्रमाच्या रु.२१.८७ कोटीच्या प्रकल्प आराखड्यास (यातील २५% राज्य हिस्सा) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.**

सदर कार्यक्रमाकरिता केंद्र शासनाचे हिश्यापोटी रु.२५,४६,८२,०००/- इतका निधी आणि राज्य हिश्यापोटी रु.२,४१,६३,०००/- इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा समावेश राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासन व राज्य शासन हिश्याच्या निधीचे प्रमाण ७५:२५ असे आहे. चालू आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या रु. २१.८७ कोटीच्या प्रकल्प आराखड्यात मंजुरी दिली असून

त्यामध्ये २५% वाटा राज्य शासनास द्यावा लागणार आहे. सदर कार्यक्रम सन २०१२-२०१७ या पंचवार्षिक योजनेमध्ये दि.३१.०१.२०१७ पर्यंत कार्यान्वित राहील.

सदर कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीपैकी अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत व अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत लेखाशिर्षनिहाय निधी अर्थसंकल्पित करुन त्यानंतर निधीचे वितरण करण्यात येईल.

हे आदेश नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९/२०१५/व्यय-१३, दि.१६.०२.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३१२१४५७०६६८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sul Dnyandeo L

Digitally signed by Sul Dnyandeo L
DN: CN = Sul Dnyandeo L, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2015.03.17 12:22:41 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
२. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
३. आयुक्त कु.क तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र मुंबई/नागपूर
५. महालेखापाल, लेखापरिक्षा महाराष्ट्र मुंबई/नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
७. संचालक आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन मुंबई
८. सहसंचालक, आरोग्य सेवा (हि. ह. व ज. रो) पुणे
९. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्प पुणे
१०. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई

१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१२.वैद्यकीय आरोग्य अधिकारी (सर्व महानगरपालिका)
१३.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद)
१४.मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१५.मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१६.मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१७.मा. प्रधान सचिव यांचे स्विय सहायक, मंत्रालय मुंबई
१८. अवर सचिव, (अर्थ) /(आरोग्य-७) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई
१९. निवडनस्ती (आरोग्य-५)